5 DEC 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वंचितांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी नवोपक्रमांची गरज

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**



शिक्षणापासून वंचितांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी दूरशिक्षण केंद्राने नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून अभिनव उपक्रम राबविले पाहिजेत. त्यासाठी शिक्षकांनी सेवावृत्ती ठेवून दर्जेदार अभ्यासक्रमांद्वारे जास्तीत जास्त विद्यार्थी दूरशिक्षण केंद्राकडे प्रवेशित होण्यासाठी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातील सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक व समन्वयक यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या मार्गदर्शन व उद्‌बोधन वर्गात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, अभ्यासक्रमांची पुनर्रचना करून मास्टर प्लॅन तयार केला पाहिजे. त्यासाठी नवोपक्रम, विविध कार्यशाळा, विविध तंत्रांचे आदानप्रदान गरजेचे आहे. आजच्या काळास अनुसरून ई-कन्टेंट डेव्हलपमेंट, ऑनलाईन सीम, कोर्सचा दर्जा उंचावणे, विविध अभिनव उपक्रम याद्वारे भविष्यात वाटचाल करणे अपेक्षित आहे. यावेळी माहिती कक्ष व समन्वयक, सहायक प्राध्यापक यांच्यासाठीच्या बैठक व्यवस्था हॉलचे तसेच महिला कक्षाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे उपस्थित होते. यावेळी उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बी. एन. तुरंबेकर यांनी आभार मानले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांनी करिअर घडविण्याकडे लक्ष देणे गरजेचे

## प्र - कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

दिव्यांग विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडविण्याकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले आहे. जागतिक अपंग दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्र (ज्ञान स्त्रोत केंद्र) व यू.जी.सी. पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज स्किम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमामध्ये डॉ. शिर्के बोलत होते. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय येथील व्हर्च्यूअल क्लासरूममध्ये करण्यात आले होते. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यापीठांमधून, महाविद्यालयांमधून, विविध संस्था व काही एनजीओं यांच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळत आहे. यामुळे हे विद्यार्थी राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतःचे व संस्थेचे नाव उज्ज्वल करत आहेत. नजीकच्या काळात कार्यक्षेत्रामधील दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्य विकसित करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील राहणार आहे. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर मार्गदर्शन करताना म्हणाले, विद्यापीठाने दिव्यांग विद्यार्थी कर्मचारी यांच्या सोयीच्या दृष्टने विविध उपक्रम व सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तसेच, आवश्यकतेनुसार गरजा ओळखून भविष्यामध्ये अनेक योजना अमलात आणण्यासाठी विद्यापीठ आग्रही राहणार आहे. या विद्यार्थ्यांमध्ये कार्य करीत राहण्याची प्रचंड क्षमता असते. विद्यार्थ्यांनी थोर शास्त्रज्ञ स्टिफन हॉकिंग यांच्या कार्य कर्तृत्वाचा आदर्श समोर ठेवला पाहिजे.

यावेळी सागर देशमुख यांनी यूडीआयडीबाबत विस्तृत माहिती दिली. तसेच, मूक व कर्णबधिर संघटनेचे अध्यक्ष स्वप्नील पाटरे व युवराज मिठारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी विविध क्षेत्रामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक प्राप्त मूकबधिर, अंध विद्यार्थी, विद्यार्थिनी व खेळाडूंचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. समन्वयक डॉ. पी. बी. देसाई यांनी स्वागत केले. ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. नमिता खोत यांनी प्रास्ताविक केले. सहायक प्राध्यापक अविनाश भाले यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अलमास पेंढारी यांनी केले. यावेळी तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. किशोर देशपांडे, सोनाली नवांगुळ यांच्यासह डॉ. एम. एस. वासवाणी, डॉ. सी. ए. लंगरे आणि दीडशेहून अधिक विद्यार्थी, विद्यार्थिनी, कर्मचारी उपस्थित होते.

पुढारी

# इंद्रधनुष्य महोत्सवासाठी विद्यापीठ संघ आज रवाना होणार

**कोल्हापूर :** राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवा महोत्सव ७ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात महोत्सव रंगणार आहे. या महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठातील ४९ जणांचा संघ बुधवारी (दि.५) नाशिकला रवाना होणार आहे. या महोत्सवात राज्यातील सर्व विद्यापीठांचे संघ सहभागी होणार आहेत. या महोत्सवात एकांकिका, लघुनाटिका, मूकनाट्य, सुगम संगीत, समूहगीत, समूहनृत्य, प्रश्नमंजुषा, वक्तृत्व स्पर्धा आदी गटांत महोत्सवात स्पर्धा होणार आहेत. महोत्सव ११ डिसेंबरपर्यंत असणार आहे.

पुढारी

# विद्यापीठात शुक्रवारपासून आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात 'मटेरियल्स व पर्यावरणशास्त्र' विषयावर शुक्रवारपासून (दि. ७) दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सकाळी दहा वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात परिषदेचे उद्घाटन होईल. कॅनडाच्या लेकहेड विद्यापीठाच्या प्रा. ल्यू ख्रिस्तोफर यांचे यावेळी बीजभाषण होणार असल्याची माहिती भाषा संयोजन समितीचे सचिव डॉ. मानसिंगराजे निंबाळकर व समन्वयक जे. बी. यादव यांनी प्रसिद्धीस दिली.

आंतरविद्याशाखीय अभ्यास आणि संशोधनाला जागतिक स्तरावर अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. मटेरिअल सायन्स आणि पर्यावरणशास्त्र यांचा संयुक्त अभ्यास करण्याच्या आवश्यकतेमधून या परिषदेचे आयोजन केले आहे. सद्य:स्थितीत मानवासमोर ऊर्जेच्या निर्मितीपासून ते प्रदूषणापर्यंतचे अनेक प्रश्न उभे आहेत. ही परिषद अशा नवतंत्रज्ञानाचा शोध घेणाऱ्या जगभरातील आंतरविद्याशाखीय संशोधक विद्यार्थी, शिक्षक, तंत्रज्ञ, तज्ज्ञ यांना एकाच व्यासपीठावर आणण्यासाठी महत्त्वाची ठरली आहे.